H

# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-अभिलेख/जिसनिअ आदेश/साखर/3830 /सन २०१९ दिनांक :- 28 /०३/ २०१९

वाचावे :-

१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१
२. शासन अधिसूचना दिनांक ३०.०३.२०१३
३. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम २ (८)
४. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) (प्रथम सुधारणा) नियम २०१७
५. प्राधिकरणाकडील जा.क्र.रासनिप्रा/ जिल्हासनिअ आदेश/५४९/सन २०१४, दिनांक १०.१०.२०१४
६. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, शासन निर्णय क्रमांक ससका-२०१६/प्र.क्र.२०५/२५-स, दि.२४.१.१९

प्रस्तावना :-

महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ मधील तरतुदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी नियम क्र.२ (८) नुसार जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी यांची व्याख्या करण्यात आली आहे. त्यानुसार उपरोक्त वाचावे क्र. ५ दिनांक १०.१०.२०१४ च्या आदेशान्वये, प्रादेशिक सहसंचालक, सहकारी संस्था (साखर) यांना त्यांचे वैधानिक अधिकारक्षेत्रासह, तसेच विभाग/राज्य/जिल्हास्तरीय कार्यक्षेत्र असलेल्या परंतू ज्या सहकारी संस्थांचे मुख्यालय त्यांच्या जिल्हयात आहे, अशा सर्व सहकारी साखर कारखान्यांच्या निवडणूकीसाठी त्यांना जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

उपरोक्त वाचावे क्र. ६ दिनांक २४.०१.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये, सोलापूर येथे स्वतंत्र प्रादेशिक सहसंचालक (साखर) सोलापूर हे प्रादेशिक कार्यालय सुरु करण्यात आले आहे. तसेच नवनिर्मित प्रादेशिक सह संचालक (साखर) या कार्यालयाअंतर्गत सोलापूर आणि उस्मानाबाद (धाराशिव) जिल्हयातील सर्व साखर कारखान्यांचे नियंत्रण देण्यात आले आहे.

वरील शासन निर्णयान्वये, प्रादेशिक सहसंचालक, सहकारी संस्था (साखर) पुणे व नांदेड यांच्या अधिकार क्षेत्रातील अनुक्रमे सोलापूर व उस्मानाबाद या दोन जिल्हयातील सर्व साखर कारखान्यांचे नियंत्रण प्रादेशिक सहसंचालक (साखर) सोलापूर यांच्याकडे देण्यात आलेने, सदर जिल्हयातील सहकारी साखर कारखान्यांच्या निवडणूकीसाठी जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून प्रादेशिक सहसंचालक सहकारी संस्था (साखर) सोलापूर यांना घोषित करणे क्रमप्राप्त झाले आहे. तसेच जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा प्रादेशिक सहसंचालक, सहकारी संस्था (साखर) पुणे व नांदेड यांच्या अधिकारक्षेत्रातून अनुक्रमे सोलापूर व उस्मानाबाद ही दोन जिल्हे वगळणे आवश्यक असल्याने प्राधिकरण पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## -: आदेश :-

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब व उक्त निवडणूक नियमातील नियम ३ अन्वये प्रापत अधिकारास अनुसरुन खालील प्रमाणे स्तंभ क्र. २ मधील अधिकारी यांना स्तंभ क्र. ३ मधील त्यांचे वैधानिक अधिकारक्षेत्रासह, तसेच विभाग/राज्य/जिल्हास्तरीय कार्यक्षेत्र असलेल्या परंतु ज्या सहकारी साखर कारखान्यांचे मुख्यालय त्यांच्या जिल्हयात आहे, अशा साखर कारखान्यांच्या निवडणूकीसाठी पुढीलप्रमाणे जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकारी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | प्रादेशिक सहसंचालक, सहकारी संस्था (साखर) पुणे | संपूर्ण पुणे व सातारा जिल्हयातील सर्व सहकारी साखर कारखाने |
| २ | प्रादेशिक सहसंचालक, सहकारी संस्था (साखर) सोलापूर | संपूर्ण सोलापूर व उस्मानाबाद जिल्हयातील सर्व सहकारी साखर कारखाने |
| ३ | प्रादेशिक सहसंचालक, सहकारी संस्था (साखर) नांदेड | संपूर्ण नांदेड, लातूर, परभणी व हिंगोली जिल्हयातील सर्व सहकारी साखर कारखाने |

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशाने.**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

२७/०३/१९

**(यशवंत गिरी)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य,पुणे.

**प्रति,**
प्रादेशिक सहसंचालक, सहकारी संस्था (साखर) पुणे/सोलापूर/नांदेड

प्रत माहितीस्तव :-

१. जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)
२. तालुका सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)